## नियमीत दरखास्त क्र.९१/१९९१ मधील
## निशाणी क्र.९८ वर आदेश
**CNRNO.MHLA110000181991.**

---

०१. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. पक्षकारांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

०२. सदर अर्ज धनकोंनी हुकूमनाम्यामध्ये नमुद मिळकतीमधील पिकाच्या किंमतीपोटी रक्कम रु.८०००/- भरुन घेऊन पुन्हा कब्जे वॉरंट काढण्याकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जाला ऋणकोंनी म्हणणे दाखल करुन पंचनाम्यामध्ये नमुद किंमत योग्य नसुन त्याकरिता संबंधीत शेती अधिकाऱ्याकडुन अहवाल मागविणे आवश्यक आहे असे कथन केलेले आहे. तसेच हुकूमनाम्यामध्ये नमुद मिळकतीमधील पिकाच्या पेरणीसाठी रु.४०००/- चे बियाणे लागलेले असुन रु.६०००/- चे खत लागलेले आहे असे कथन केलेले आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची सदर ऋणकोंनी शेवटी मागणी केलेली आहे.

०३. सदर प्रकरणातील कागदपत्रांवरुन याठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते की, सदर दरखास्त प्रकरण धनकोंनी नि.दि.दा.क्र.२२७/१९७९ मधील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरिता दाखल केलेला आहे. सदर प्रकरणातील नि.क्र.८८ वरील कब्जा वॉरंटला दि.०४/०२/२०२० रोजी दाखल अहवालावरुन स्पष्ट होते की, हुकूमनाम्यामध्ये नमुद वादग्रस्त मिळकतीच्या हद्दी खुणा मोजणी विभागातील तज्ञाने दाखविलेल्या आहेत. तसेच सदर हुकूमनाम्यामध्ये नमुद

मिळकतीमध्ये हरभऱ्याचे पिक असल्याचे व त्याची किंमत रु.८०००/– होत असल्याचे अहवाल संबंधीत बेलिफाने अहवाल व पंचनामा दाखल केलेला आहे.

०४. प्रकरणातील ऋणकोंनी म्हणण्याद्वारे पंचनाम्यात व अहवालात नमुद किंमत अंदाजे नमुद करण्यात आल्यामुळे स्वीकारता येत नसल्याचे कथन केलेले असुन मिळकतीमधील पेरणीसाठी एकुण रु.१००००/– खर्च झाल्याचे कथन केलेले आहे. सदर ऋणकोंनी दाखल केलेल्या म्हणण्यावरुन व प्रकरणाच्या प्रलंबित कालावधीवरुन याठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते की, प्रकरण सन १९९१ पासुन प्रलंबित असुन प्रकरणातील हुकूमनाम्याची अंमलबजावणी लवकरात लवकर होणे आवश्यक आहे. त्यामुळे म्हणण्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे मिळकतीमधील पिकाबाबत संबंधीत शेती अधिकाऱ्याकडुन अहवाल मागविणे न्यायोचित होणार नाही. तसेच ऋणकोंतर्फे म्हणण्यामध्ये नमुद रक्कम रु.१०,०००/– भरण्यास तयार असल्याचे धनकोंतर्फे विद्वान वकिलांनी युक्तिवाद केला. त्यामुळे नि.क्र.८८ सोबत दि.०४/०२/२०२० रोजी दाखल अहवाल व पंचनाम्यामध्ये नमुद रक्कम रु.८०००/– ऐवजी रक्कम रु.१०,०००/– धनकोकडुन भरुन घेऊन अर्जात मागणी केल्याप्रमाणे पुन्हा कब्जे वॉरंट काढल्यास ऋणकोंचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. नि.क्र.९८ वरील अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रकरणातील हुकूमनामा म्हणजेच नि.दि.दा.क्र.२२७/१९७९ मधील हुकूमनाम्यामध्ये नमुद दावा मिळकतीमधील पिकाच्या किंमतीपोटी रक्कम रु.१०,०००/-(दहा हजार रुपये फक्त) धनकोंनी न्यायालयात जमा करावी व सदरची रक्कम सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांनी धनकोंकडुन स्वीकारावी.

३. अर्जात मागणी केल्याप्रमाणे पुन्हा कब्जे वॉरंट काढण्यात यावे.

Digitally signed by Shivakant Machhindra Gourgond
Date: 2020.02.14 17:48:14 +0530

दि.१४.०२.२०२०. (शिवकांत म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.